क्रमांक : ९३७६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २९ मे, २०२६

**:: कार्यालयीन आदेश ::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या वाहन धोरणानुसार विधानमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा.उप पीठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद/विधानसभा तसेच विविध पदाधिकारी यांचे करिता व या सचिवालयाच्या कार्यालयीन वापराकरिता वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सदर वाहने सुस्थितीत ठेवण्याकरिता व वाहनांच्या देखभाल-दुरूस्तीकरिता या सचिवालयातील खालील अधिकारी/कर्मचारी यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १) | **श्रीमती प्राजक्ता कुळकर्णी, अवर सचिव** | **समिती अध्यक्ष** |
| २) | श्रीमती वृषाली देशमुख, कक्ष अधिकारी | सदस्य सचिव |
| ३) | श्री.सुशिल भाटकर, ध्वनीयंत्रणाचालक तथा यांत्रिक | समिती सदस्य |
| ४) | श्री.धनाजी मोरे, वाहनचालक | समिती सदस्य |
| ५) | श्री.रामचंद्र जगताप, वाहनचालक | समिती सदस्य |
| ६) | श्री.संजय चौरे, मदतनीस | समिती सदस्य |

**समितीची कार्यकक्षा :-**

(१) उपरोक्त नमूद अधिकारी/कर्मचारी यांनी या सचिवालयातील वाहनांसंबंधी कामाची नोंदवही तयार करणे.

(२) सदर नोंदवहीमध्ये दोन भाग करून एका भागामध्ये वाहनांच्या नियमित देखभाल-दुरूस्तीच्या नोंदी घेण्यात याव्यात तसेच देखभाल-दुरूस्ती व्यतिरिक्त काही कामे केली असल्यास, त्याच्या नोंदी घेण्यात याव्यात.

(३) नोंदवहीच्या भाग-२ मध्ये विधानमंडळातील वाहनांवर नियुक्त वाहनचालक आठवड्यातून किमान ३ वेळा वाहन धुणे, वाहनांची साफसफाई इ.कामे करित आहे किंवा नाही यांच्या नोंदी घेतील. विधानमंडळ सचिवालयाच्या कार्यालयीन वापरासाठी असलेल्या वाहनांच्या साफसफाईसाठी विधानमंडळ सचिवालयातील नियुक्त वाहनचालकांची नियमित क्रमवारीनुसार नियुक्ती करतील.

(४) उपरोक्तप्रमाणे नोंदवहीमध्ये नोंदी घेऊन आठवड्याच्या प्रत्येक शुक्रवारी समिती अध्यक्षांच्या निदर्शनास आणतील व दर महिन्याच्या अंतिम शुक्रवारी मा.सचिव-४ यांच्या आदेशार्थ सादर करतील.

आदेशानुसार,

**(घ.ज्ञा.देबडवार)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

**प्रति,**

उपरोक्त नमूद अधिकारी/कर्मचारी

**प्रतिलिपी :-**

१) मा.सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

२) मा.सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

३) अवर सचिव (श्रीमती कुळकर्णी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

४) 'क-४' (अर्थसंकल्प) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

५) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता)

६) निवडसूची